दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४३१ वा • सोमवार, ता. २० ऑक्टोबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


शुभ दीपावली

## आ.राजळेंच्या निवासस्थानी होणार काळी दिवाळी



**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसनराव चव्हाण, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत शेतकरी विरोधी फडणवीस सरकारचा निषेध करण्यासाठी शेवगाव-पाथर्डी मतदार संघाच्या आमदार मोनिकाताई राजळे यांच्या कासार पिंपळगाव येथील निवासस्थानी मंगळवारी दिवाळी सणाच्या दिवशी सकाळी ११ वाजता चटणी भाकर खाऊन काळी दिवाळी साजरी करणार आहेत. याबाबत प्रा. चव्हाण यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. परंतु, सरकारने शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत करून अक्षरशः थट्टा केली आहे. त्यामुळे खालील मागण्या करत हे आंदोलन करणार आहोत. महाराष्ट्र शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून शासनाने द्यावेत, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करुन ७/१२ कोरा करावा, पोटखराबा व वर्ग दोन जमीनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळावी, शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील पोटखराबा नोंद असलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील पोटखराबा त्वरित दुरुस्त करावा, सरकारी जमीनींवरील अतिक्रमणे निवासस्थानाकरिता कायम करावीत, या वर्षीचा ऊसाचा गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वी ऊस कारखानदारांनी भाव जाहीर करावा, शेतकऱ्यांची लुटमार थांबवण्यासाठी शेवगाव व पाथर्डी तालुक्यात सी. सी. आय. कापूस खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, अशा अनेक मागण्यांसाठी शेवगाव-पाथर्डी मतदार संघाच्या निष्क्रिय आमदार मोनिका राजळे यांच्या निवासस्थानी चटणी भाकरी खाऊन काळी दिवाळी साजरी करणार आहोत.

## सुट्ट्यांचे वेतन द्या, अन्यथा राज्यभर कामबंद

### मोबाईल टॉवर कर्मचाऱ्यांची पेमेंटवाढ रद्द

**अहमदनगर । विजय मते**

महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर टेक्निकल एम्प्लॉइज असोसिएशनच्या वतीने नगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत राज्यातील सर्व मोबाईल टॉवर तांत्रिक कर्मचाऱ्यांनी पेमेंट वाढ, बोनस आणि सुट्ट्यांच्या मोबदल्याची थकबाकी तत्काळ देण्याची मागणी करत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. संघटनेचे अध्यक्ष सदाशिव खेडकर, उपाध्यक्ष किशोर साठवणे, सचिव समीर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड. श्रीरंग गिते तसेच सोपान शिंदे, रवी साळवे, बाबासाहेब गायकवाड, शामसुंदर जाधव, अश्फाक शेख, नारायण पाटील, किरण निकम आदी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, वाढत्या महागाईच्या काळात आमचे वेतनवाढीचे प्रस्ताव रद्द करून उलट ५०० ते ६००० रुपयांपर्यंत कपात करण्यात आली आहे. हे अत्यंत अन्यायकारक आहे. शिवाय, वर्ष २०२५ मधील सर्व सुट्ट्या व राष्ट्रीय सुट्ट्यांचे सुमारे ११,४०० रुपयांचे वेतन अद्याप दिलेले नाही. पुण्यातील लेबर कमिशनर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चेत कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आणि संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र, चर्चेनंतरही कोणताही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संघटनेने स्पष्ट केले की, सोमवारपर्यंत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आम्ही राज्यभर कामबंद आंदोलन छेडू. जोपर्यंत थकबाकी आणि पेमेंटवाढ अंमलात आणली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही. या आंदोलनाचा परिणाम अहिल्यानगर, संभाजीनगर, जळगाव, जालना, बीड, हिंगोली, लातूर, परभणी, औरंगाबाद, बुलढाणा, नांदेड अशा जिल्ह्यांतील मोबाईल नेटवर्कवर होऊ शकतो, असा इशारा असोसिएशनने दिला आहे.. संघटनेच्या मते, लेबर कमिशनर यांच्या हस्तक्षेपानंतरही कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने आता सर्व जिल्ह्यांमध्ये संघटितपणे आंदोलन उभारले जाणार आहे. मोबाईल टॉवर कर्मचाऱ्यांचे हे आंदोलन केवळ वेतनवाढीसाठी नव्हे, तर कष्टाला न्याय्य मोबदला मिळवण्यासाठी असल्याचे संघटनेने ठामपणे नमूद केले आहे. कंपनीने लवकर निर्णय घ्यावा, अन्यथा नेटवर्क सेवा खंडित झाल्यास जबाबदारी कंपनीवरच राहील, असा इशारा संघटनेच्या नेत्यांनी दिला.


दैनिक रयत समाचारचा दिवाळी-पाडवा विशेषांक मंगळवार ता.२१ रोजी प्रसिद्ध होत आहे.

दिवाळी-पाडवा विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात.

- संपादक

रयत समाचार,

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

लेख, माहिती व जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,

तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४


# प्रधानमंत्री खनिजक्षेत्र कल्याण योजना दिव्यांगांसाठी स्वयंरोजगाराची नवी दिशा

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ई-रिक्षा वाटप




**नागपूर । रयत समाचार**

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना रोजगाराचे नवे दालन खुले झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थ्यांना ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून दिव्यांगांना सन्मानाने आणि स्वावलंबनाच्या मार्गावर नेणारे रोजगार साधन उपलब्ध झाले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते. तसेच मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ. आशिष देशमुख, आमदार डॉ. परिणय फुके आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले, दिव्यांग बंधू-भगिनी हे समाजातील महत्त्वाचा घटक आहेत. शासन त्यांना फक्त मदतच नाही, तर आत्मनिर्भरतेच्या मार्गावर नेण्यासाठी ठोस पावले उचलत आहे. ई-रिक्षा वाटप हा त्याच दिशेने घेतलेला उपक्रम असून, प्रत्येक लाभार्थ्याच्या आयुष्यात 'स्वाभिमानाचे चाक' फिरवणारा क्षण आहे. यावेळी लाभार्थ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू झळकले. अनेकांनी सांगितले, ई-रिक्षामुळे आमचे पायावर उभे राहण्याचे स्वप्न साकार झाले आहे. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत राबविण्यात आलेला हा उपक्रम 'समाजातील सर्व घटकांना समान संधी' देण्याच्या राज्य सरकारच्या निर्धाराचे प्रतीक ठरला आहे.




## साईदर्शनानंतर सूर्यकुमार 'ऑस्ट्रेलिया मिशन'साठी सज्ज

**शिर्डी । रयत समाचार**

ऑस्ट्रेलियाच्या वेगवान खेळपट्ट्यांवर धावांचा पाऊस पाडण्यापूर्वी भारतीय संघाचा स्टार फलंदाज आणि कर्णधार सूर्यकुमार यादव श्रद्धेच्या मार्गाने प्रेरणा घेताना दिसला.

आगामी टी-२० मालिकेपूर्वी (२९ ऑक्टोबरपासून) सूर्यकुमारने पत्नी दिविशा शेट्टीसह शिर्डी येथील साईबाबा मंदिरात हजेरी लावून साईसमाधीसमोर नतमस्तक होत प्रार्थना केली.

आगामी मालिकेत भारतीय संघाला यश मिळावे, देशाचा तिरंगा पुन्हा उंच फडकावा यासाठी सूर्याने साईबाबांकडे साकडे घातले. श्रद्धा आणि क्रिकेटचा हा सुंदर संगम पाहण्यासाठी शिर्डीत उपस्थित भाविकांनीही ''जय साईराम''च्या घोषणांनी वातावरण दुमदुमवले. टीम इंडियाचा हा 'सूर्य' आता कांगारूंच्या भूमीवर भारतीय चाहत्यांसाठी लढण्यास सज्ज आहे.




## दिलीप गुंजाळ यांना 'पुष्पा नाथानी पुरस्कार'

**पुणे । रयत समाचार**

समाजातील उपेक्षित, बेघर आणि मनोरुग्ण व्यक्तींना आयुष्याचा नवा आधार देणारे, तसेच मानवी तस्करीच्या विळख्यात अडकलेल्या आदिवासी कुटुंबांची मुक्तता घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणारे श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे संस्थापक दिलीप वसंत गुंजाळ यांना यंदाच्या म्हणजे २०२५ च्या 'पुष्पा नाथानी पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील रेलफोर फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या या प्रतिष्ठेच्या पुरस्कारात गुंजाळ यांना दहा लाख रुपयांचे पारितोषिक आणि मानचिन्ह प्रदान करण्यात आले. समाजसेवेसाठी आयुष्य झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्याचा या पुरस्काराचा उद्देश आहे. गेल्या अनेक दशकांपासून दिलीप गुंजाळ यांच्या 'अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळा' मार्फत रस्त्यावरील बेघर, निराधार, आणि मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्तींसाठी उपचार, निवारा, अन्न, वस्त्र, औषधोपचार आणि पुनर्वसन यांची निःस्वार्थ सेवा केली जाते. त्यांच्या प्रयत्नांतून ११४ आदिवासी कुटुंबांची मानवी तस्करीतून मुक्तता झाली असून, त्या कुटुंबांतील ४८ बालकांना शिक्षण व पुनर्वसनाचा आधार मिळाला आहे.

## श्रमधामच्या १०० घरांची पायाभरणी करणार- तवडकर

### कोठंबीतील घराची चावी प्रभुदेसाई कुटूंबियांना सूपूर्द

**केपे / रयत समाचार**

श्रमधाम चळवळीच्या माध्यमातून येत्या जानेवारी महिन्यात एकाच दिवशी एकाच वेळी १०० घरांची पायाभरणी करून प्रत्येक घरासाठी १०० श्रमधाम वॉरियर्स तर १०० घरांसाठी १० हजार श्रमधाम वॉरियर्स तयार केले जातील, अशी घोषणा कला आणि संस्कृती मंत्री रमेश तवडकर यांनी आज येथे केली. कोठंबी अवेडे येथे आनंदू प्रभू देसाई यांच्या श्रमधाम योजनेंतर्गत १५ दिवसात बांधलेल्या घराची चावी सुपूर्द केल्या नंतर ते बोलत होते. यावेळी अखिल गोवा स्वातंत्र्य सैनिक संघटना फेडरेशनचे अध्यक्ष रोहिदास देसाई,पैगीण पंचायतीच्या सरपंच सविता तवडकर,कोठंबी पंचायतीचे सरपंच भुपेंद्र प्रभु देसाई, उप सरपंच शिल्पा प्रभुदेसाई, देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रशांत प्रभुदेसाई,पंच सिध्दार्थ कालेकर, दक्षिण गोवा जि. पं. सदस्य सिध्दार्थ गावस देसाई, सुरेश केपेकर,केपेचे उपनगराध्यक्ष अमोल काणेकर, काणकोणचे नगराध्यक्ष लक्ष्मण पागी, रामचंद्र प्रभुदेसाई आदी उपस्थित होते. तवडकर पुढे बोलताना म्हणाले, खरे म्हणजे हे घर २५ दिवसात पूर्ण करण्याचा संकल्प आपण केला होता.नंतर २२ दिवस जाहीर केले. परंतु




आमच्या उत्साही श्रमधाम वॉरियर्सनी हे घर केवळ १५ दिवसात बांधून पूर्ण केले व आज दिवाळीच्या शूभ मूहुर्तावर आम्ही ते देसाई कुटुंबियांना सुपूर्द केले. आपला विश्वास परशुराम व अर्जून गवंडी यांच्या संपूर्ण टीम वर होता तसेच जिल्हा पंचायत सदस्य सिध्दार्थ गावस देसाई यांच्या नेतृत्वाखाली सर्वांनी एकत्र येऊन जे काम केले त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे असे तवडकर म्हणाले. गावातील गावपण माणूसकी मरत चालली आहे ती पुन्हा जीवंत करण्यासाठी श्रमधाम चळवळीच्या माध्यमातून आपण प्रयत्न करीत आहे आणि आपले श्रमधाम वॉरियर्स ती जीवंत ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी मनोगत व्यक्त करताना अनिता प्रभुदेसाई म्हणाल्या, आपल्याला श्रमधाम योजनेतून घर बांधून दिले जाणार यावर सुरवातीला विश्वासच बसत नव्हता. परंतु मंत्री रमेश तवडकर यांनी अशक्य ते शक्य करून दाखवले आणि आपला विश्वास त्यांनी संपादन केला. अगदी अल्पावधीतच त्यांनी घर बांधून दिले.आपण उभ्या आयुष्यात घर बांधू शकले नसते. कारण आर्थिक परिस्थिती तशी नाही. नवरा आजारी त्यात दोन मुले पदरात त्यांना शक्य होईल तेवढे थोडे फार शिक्षण दिले. यावेळी मंत्री रमेश तवडकर यांचा कोठंबी ग्रामस्थांतर्फे खास स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच घर बांधण्यासाठी योगदान दिलेल्या श्रमधाम वॉरियर्सचा मंत्री तवडकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. स्वागत सविता तवडकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ सर्वानंद सावंत देसाई यांनी केले तर शेवटी आभार सिध्दार्थ गावस देसाई यांनी मानले.

# कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे ही काळाची गरज- खा.पवार

### अंबिका विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्‌घाटन

**अहमदनगर । रयत समाचार**

तंत्रज्ञानाच्या युगात बदलत्या काळाशी जुळवून घेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करणे ही आजची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आज सर्व क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक बदल घडवत आहे. शिक्षण क्षेत्रातही एआयचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ, दर्जेदार आणि आधुनिक करण्याचे प्रयत्न रयत शिक्षण संस्थेत सुरू आहेत, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार यांनी केले. केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी खा. शरद पवार बोलत होते. प्रारंभी कोनशीलेचे अनावरण व फीत कापून नवीन इमारतीचे उद्घाटन झाले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते विद्यालय



परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्था (सातारा) चे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली खासदार निलेश लंके, विभागीय चेअरमन आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, पद्मश्री पोपट पवार, ॲड. भगीरथ शिंदे, प्राचार्य नवनाथ बोडखे, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, ''कृत्रिम बुद्धिमत्तेने लोकांच्या जीवनात मोठा बदल घडवला आहे. शेतीतही या तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना मदत करता येईल. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी धैर्याने पुढे जावे.'' त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे महत्त्वही अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तर विभाग अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी केले. सन १९६९ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ३ कोटी ८१ लाख रुपये खर्च करून अत्याधुनिक संकुल उभारण्यात आले आहे. कला शिक्षकांनी परिसर सजविण्यात योगदान दिले, तसेच सर्व देणगीदार व सहकार्यकर्त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले, एआय उपकरणे व रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटनही झाले. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाला मिळालेल्या आदर्श विभागीय पुरस्काराचे सत्कार खा. शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. चेअरमन चंद्रकांत दळवी म्हणाले की, शाळेच्या नवीन संकुलाचे नियोजन उत्कृष्ट झाले असून, भविष्यात हे इतर शाळांसाठी मॉडेल ठरेल. विद्यार्थ्यांना रोबोटिक, थ्रीडी पेंटिंग, कोडिंगसारखे आधुनिक शिक्षण देण्यात येत आहे. लवकरच एआरपीद्वारे सर्व काम पेपरलेस करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जगदाळे यांनी केले, तर विद्यालयातील सर्व सेवकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# कॉ. भागवत वादविवाद स्पर्धेत मालपाणी लॉ कॉलेज विजेता



**अहमदनगर । आबीद खान**

कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगर येथे ९ व १० ऑक्टोबर २०२५ रोजी दोन दिवसीय राज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वादविवाद स्पर्धेत श्री. ओंकारनाथ मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेरच्या आकाश बोडखे व इरफान शेख यांनी प्रथम क्रमांक पटकावला. याच संघाने वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. पी. एन. पी. कॉलेज, अलिबागचे यश पाटील व पंकज पांडूळे यांनी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तर जितेंद्र राउत व पंकज पांडूळे यांनी वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. वादविवाद स्पर्धेत तृतीय क्रमांक पार्थ चिडे व सचिन गायकवाड, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज, पुणे यांनी मिळवला. तर वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक अनुजा गाढे व पूजा जाधव, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांनी मिळविला. वादविवाद व वक्तृत्व या दोन्ही स्पर्धांमध्ये चतुर्थ क्रमांक निखील बोडखे, न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव यांनी मिळवला. उत्तेजनार्थ बक्षीस वादविवाद स्पर्धेसाठी वैष्णवी निर्मळ, पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ फार्मसी, लोणी व विश्वास दसगुडे, सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर, पुणे यांना देण्यात आले. तर वक्तृत्व स्पर्धेसाठी संपदा लांडगे, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांचा समावेश झाला. ज्युनिअर कॉलेज गटातील वादविवाद स्पर्धेत कार्तिकी पवार व सान्वी लिखे यांच्या रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेज संघाने विजेतेपद मिळवले. पारितोषिक वितरण समारंभास शेतकरी नेते कॉम्रेड सुभाष लांडे प्रमुख पाहुणे तर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे खजिनदार मा. ॲड. दीपलक्ष्मी म्हसे अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, सध्याच्या काळात प्रत्येक मुद्याचे राजकारण केले जात असून प्रचंड संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे तरुणांनी विचारपूर्वक कृती करणे आवश्यक आहे. तसेच अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना आपली भाषा जपून योग्य पद्धतीने मुद्दा मांडण्याचा सल्ला दिला. या स्पर्धेसाठी मा. प्रा. निलेश पर्बत, संगमनेर व मा. जगदीश पवार, पुणे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवकी ढोकणे यांनी केले तर आभार प्रकट डॉ. सुनीता मोटे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. कळमकर, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. ए. ई. आठरे आणि कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या आस्थाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार

# बाजारपेठा गर्दीने फुलल्या; वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त






**अहमदनगर । तुषार सोनवणे**

दिवाळीचा सण दोन दिवसांवर आल्याने शहरात उत्साहाचे वातावरण झाले आहे. सायंकाळी शहरातील वाहन शोरूम, मुख्य बाजारपेठा, कपड्यांची दुकाने आणि ज्वेलर्स दुकानांत खरेदीसाठी नागरिकांची प्रचंड गर्दी उसळली. सोन्याचे दर गगनाला भिडलेले असतानाही नागरिकांचा कल सोन्या-चांदीच्या खरेदीकडेच दिसतोय. पारंपरिक सणांसह शुभमुहूर्त साधत अनेकांनी दागिने, नाणी आणि नवीन अलंकार खरेदी करत दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. कपड्यांबरोबरच इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंनाही चांगली मागणी असून विविध कंपन्यांनी आकर्षक ऑफर्स आणि सवलती जाहीर केल्यामुळे नागरिकांची गर्दी मोबाइल, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीनसह गृहोपयोगी वस्तूंच्या दुकानांकडे वळली. अलीकडच्या काळात इलेक्ट्रिक वाहनांकडे नागरिकांचा वाढता कलही स्पष्ट जाणवतोय. त्यामुळे शहरातील टू-व्हीलर आणि फोर-व्हीलर शोरूमसमोर वाहन खरेदीदारांची झुंबड उडाली. दरम्यान, खरेदीच्या या उत्साहात शहरातील वाहतूक मात्र पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मुख्य बाजारपेठा, तारकपूर रोड, आणि सर्जेपुरा मार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. सर्जेपुरा मार्गासह शहरातील अनेक रस्त्यांची काम सुरू असल्याने सिंगल लाईन वाहतूक सुरु आहे, त्यामुळे उपनगरातून शहरात येणाऱ्या वाहनांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पायी चालणेही कठीण झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. यावर्षी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असले तरी नागरिकांच्या दिवाळी सण साजरा करण्याच्या उत्साहात किंचितही कमीपणा जाणवत नाही. दुकाने, बाजारपेठा आणि गल्लीबोळ दिवाळीच्या रोषणाईने उजळले आहेत. मात्र, वाढत्या गर्दी आणि वाहतूक कोंडीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून प्रशासनाकडे होत आहे. रयत समाचार

# मानसी चव्हाण यांची 'अविष्कार' स्पर्धेत निवड



**अहमदनगर । रयत समाचार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय 'अविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी उपकेंद्र अहिल्यानगर येथील एफ.वाय. बी.एस्सी. डेटा सायन्स विभागातील कु. मानसी चव्हाण हिची निवड झाली आहे.

ही स्पर्धा ता. ११ ते १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे होणार आहे. कु. मानसी चव्हाण हिने जिल्हास्तरीय पातळीवर "Password Based Circuit Breaker" हा प्रकल्प सादर करून विशेष लक्ष वेधले.

या प्रकल्पाचा उद्देश लाईनमनच्या कार्यावेळी त्याच्या जीवित सुरक्षेसाठी सहाय्यक तंत्र विकसित करणे हा आहे. तिच्या या नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पाचे जिल्हा पातळीवर कौतुक झाले असून विद्यापीठस्तरीय निवडीस पात्र ठरली आहे. या यशामागे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, प्रा. संदीप पालवे, विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर, सहायक कुलसचिव डॉ. शिवप्रसाद घालमे, प्रा. डॉ. बाबासाहेब थोरवे, प्रा. प्रियांका मेटकर, डॉ. अर्चना रोहोकले, प्रा. गणेश आव्हाड, प्रा. दर्शना गांधी, प्रा. लाविना भैरी, प्रा. गायत्री करपे आणि प्रा. मेघना कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल कु. मानसी चव्हाण हिच्यावर संस्थेच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# शरद पवार यांना उच्च न्यायालयाचा दिलासा



**नगर तालुका । रयत समाचार**

चिचोंडी पाटील गावचे सरपंच आणि महाविकास आघाडीचे युवानेते शरद खंडेराव पवार यांना छत्रपती संभाजीनगर खंडपीठाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी व नाशिक विभागीय उपायुक्त यांच्या अपात्रतेच्या आदेशाला उच्च न्यायालयाने स्थगिती देत त्यांचे सरपंचपद कायम ठेवले. सरपंच पवार गावात परतल्यावर ग्रामस्थांनी ढोलताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य मिरवणूक काढून त्यांचे स्वागत केले. मागील महिन्यात जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी पवार यांना अतिक्रमण प्रकरणात सरपंचपदावरून अपात्र ठरवले होते. याविरोधात पवार यांनी नाशिक विभागीय उपायुक्तांकडे तसेच नंतर छत्रपती संभाजीनगर खंडपीठात अपील दाखल केले होते. न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांच्या खंडपीठाने जिल्हाधिकारी आणि उपायुक्त यांच्या आदेशाला स्थगिती दिली. सुनावणी दरम्यान पवार यांच्यावतीने ज्येष्ठ वकील ॲड. आर. एन. धोरडे व ॲड. विठ्ठल दिघे यांनी बाजू मांडली. विरोधी गटाकडून ॲड. अश्विन होण यांनी काम पाहिले. अतिक्रमणासंदर्भात कोणतेही ठोस पुरावे न मिळाल्याने न्यायालयाने पवार यांच्या बाजूने निर्णय दिला. या निर्णयानंतर सरपंच पवार यांनी म्हटले की, "सत्य परेशान हो सकता है, पराजित नही. हा सत्याचा विजय आहे." त्यांनी खासदार निलेश लंके, ॲड. धोरडे, ॲड. दिघे, तसेच ग्रामस्थांचे आभार मानले.

# जेएसएस गुरुकुल विद्यार्थ्यांची उपेक्षित मुलांसह दिवाळी साजरी

## बालगृहातील मुलांना फराळ, कपडे, अन्नधान्य व किराणा साहित्याची भेट



**अहमदनगर । रयत समाचार**

'दिवाळीचा खरा आनंद तोच, जेव्हा आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेतो," या भावनेतून केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उपेक्षित व अनाथ मुलांसह दिवाळी साजरी करत समाजात एक सकारात्मक संदेश दिला. गुरुकुलच्या मैदानात आयोजित या दिवाळी सेलिब्रेशन कार्यक्रमात तपोवन रोडवरील बालगृह प्रकल्पातील मुले सहभागी झाली होती. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी या बालमित्रांना दिवाळी भेटवस्तू, फराळ, कपडे, अन्नधान्य आणि किराणा साहित्य देऊन सणाचा आनंद द्विगुणित केला. हा उपक्रम शाळेचे प्राचार्य आनंद कटारिया आणि प्राचार्या निकिता कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी निखिल बेद्रे, अक्षय नायडू, वैशाली देशमुख, हर्षा कार्ले, बिना आरवडे, अनुपमा तोडमल, योगिता पाठक आदी शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी घरून आणलेला फराळ व भेटवस्तू बालगृहातील मुलांना दिल्या. त्या स्वीकारताना मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. शाळेतील आणि बालगृहातील विद्यार्थ्यांनी एकत्र खेळ, गाणी, नृत्य आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून दिवाळीचा उत्सव साजरा केला. प्राचार्य आनंद कटारिया म्हणाले, "आजची पिढी फक्त सण साजरा करण्यापुरती मर्यादित राहू नये; समाजातील दुर्बल घटकांपर्यंत आनंद पोहोचविणे हेही आपले कर्तव्य आहे. फटाके फोडून आनंद घेण्यापेक्षा त्या पैशातून वंचितांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारी दिवाळी साजरी व्हावी, हाच या उपक्रमाचा उद्देश आहे." प्राचार्या निकिता कटारिया म्हणाल्या, "शिक्षण फक्त पुस्तकी मर्यादित राहू नये. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष जीवनातील मूल्ये आत्मसात करावीत. उपेक्षित मुलांसह दिवाळी साजरी केल्याने त्यांच्यात संवेदनशीलता, समजूतदारपणा आणि सामाजिक जाण वाढते. हेच आमच्या शाळेच्या संस्कारशिक्षणाचे ध्येय आहे." या सामाजिक उपक्रमासाठी समस्त हिंदू बांधव संघटनेच्या जिल्हाध्यक्षा ज्योती वाघस्कर, जिल्हा उपाध्यक्षा शितल दळवी, रुक्मिणी ठोंबरे यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाबद्दल बालगृह प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी आभार व्यक्त केले.

# गौरी दळवी राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत विजयी




**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयातील गौरी कांतीलाल दळवी हिने राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक पटकावले. छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच पार पडलेल्या १६ ते १८ किलो वजन गटातील राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा २०२५-२६ मध्ये गौरीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यापूर्वी गौरीने पुणे विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली होती. राज्यस्तरीय स्पर्धेतही तिने आपली उत्कृष्ट कामगिरी सादर केली. या यशाबद्दल शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका छाया काकडे यांनी गौरी दळवीचा सत्कार केला आणि तिच्या कामगिरीमुळे शहराचे व शाळेचे नाव राज्यात उंचावले असल्याचे व्यक्त केले. गौरी दळवीच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, माजी सचिव शिवाजीराव भोर, जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे, ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक कळमकर, शौकत तांबोळी, विभागीय अधिकारी नवनाथजी बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, कैलासराव मोहिते, तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया काकडे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर, मार्गदर्शक तायक्वांदो प्रशिक्षक व क्रीडा विभाग प्रमुख प्रदीप पालवे, संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांनी तिचे अभिनंदन केले आणि आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# भाजपा जामखेड तालुक्याची जंबो कार्यकारिणी जाहीर

**जामखेड । रिजवान शेख**

भाजप जामखेड तालुक्याची नवीन जंबो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटन बांधणीला अधिक बळकटी देत आगामी निवडणुकांसाठी भाजपचा पाया मजबूत करण्याच्या उद्देशाने विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा तालुकाध्यक्ष बापूराव ढवळे यांनी ही कार्यकारिणी घोषित केली. या कार्यकारिणीत युवा, महिला, शेतकरी, व्यावसायिक आणि समाजकारणी अशा सर्व घटकांचा समावेश करून पक्षाचा व्याप वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी ज्येष्ठ कार्यकर्त्यांवर सोपविण्यात आली असून उपाध्यक्ष, सरचिटणीस, संघटन मंत्री, कोषाध्यक्ष तसेच विविध आघाडी प्रमुख पदांची घोषणाही यावेळी करण्यात आली. पक्षाची विचारधारा, विकासनिष्ठ धोरणे आणि केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. तसेच पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक गावात प्रबळ कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. घोषित महत्त्वाची पदे: बापूराव बाबुराव ढवळे मंडलाध्यक्ष, महारुद्र विष्णू महारनवर, उदयसिंह तुषार पवार, गणेश अजिनाथ लटके, सुरेश लालासाहेब खोसे, कांतीलाल लक्ष्मण वराट, भागवत दशरथ सुरवसे, तान्हाजी खंडेराव फुंदे, नवनाथ आण्णासाहेब ढवळे, राम नरहरी पवार उपाध्यक्ष,

## निष्ठावंत कार्यकर्त्यांना जबाबदारी

महालिंग नागनाथ कोरे, ईश्वर दादासाहेब मुरूमकर, भागवत दिगंबर जायभाय सरचिटणीस, पोपट लक्ष्मण जमदाडे, भिमराव अरुण कापसे, मच्छिंद्र गहिनीनाथ गिते, सदाशिव अशोक कवादे, बापूसाहेब प्रल्हाद माने, मिलींद वसंतराव देवकर, किशोर दिगंबर भोळे,



नाना किसन आढाव, सचिन विश्वनाथ मंलगनेर चिटणीस, डॉ. जयराम सखाराम खोत (वंजारवाडी) कोषाध्यक्ष. तसेच प्रशांत मारुती शिंदे युवा मोर्चा अध्यक्ष, संजीवणी वैजिनाथ पाटील महिला अध्यक्ष, ॲड. सुभाष शामराव जायभाय ओबीसी मोर्चा अध्यक्ष, निजाम कालेखा शेख अल्पसंख्याक अध्यक्ष, भारत श्रीपती आहेर अनुसूचित जाती आघाडी, तुकाराम ज्ञानदेव कुमटकर किसान आघाडी, किशोर महादेव मुंढे सोशल मीडीया प्रमुख, आप्पासाहेब रमेश ढगे प्रसिद्धी प्रमुख, महेश सुरेश दिंडोरे व्यापारी आघाडी, महादेव अंकूश राऊत माजी सैनिक आघाडी, डॉ. दीपक बाळासाहेब वैद्यकीय आघाडी, नानासाहेब मुरलीधर माने भटक्या विमुक्त आघाडी, एकनाथ प्रल्हाद गोपाळघरे जेष्ठ कार्यकर्ता आघाडी, गणेश दादासाहेब जगताप पशुवैद्यकीय आघाडी, अमर भगवान कोरे विधी आघाडी, दत्तात्रय भिमराव शिंदे पंचायत राज, ग्रामविकास आघाडी, दादासाहेब विष्णु मोहिते शिक्षक आघाडी, आरकेश रेवणनाथ गायकवाड कामगार आघाडी, सचिन नवनाथ घुमरे सहकार आघाडी, तर



जालिंदर दत्तात्रय चव्हाण यांची उद्योजक आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कायम निमंत्रित सदस्यांमध्ये: सभापती प्रा. राम शिंदे, माजी पंचायत समिती सभापती डॉ. भगवान मुरूमकर, रवी सुरवसे, शरद काले, विष्णु भोंडवे, वैजिनाथ पाटील, नंदकुमार गोरे, सिताराम ससाणे, गौतम उतेकर, पांडुरंग उबाळे, अशोक महारनवर, नारायण जायभाय, विष्णू गंभीरे, बाजीराव गोपाळघरे, तुषार पवार, आबासाहेब ढवळे, आजिनाथ हजारे, बापूसाहेब भोरे, संजय गोपाळपरे, केशव वनवे, जालिंदर खोटे, सोपान गोपाळघरे, दादासाहेब वारे, राम पवळ, राजेंद्र ओमासे, लहू शिंदे, संतराम सुळ, नानासाहेब गोपाळपरे, शाहुराव जायभाय, ॲड. बंकट बारवकर, ॲड. संजय पारे, दशरथ हजारे, सुभाष काळयाते, राजेंद्र मासाळ, भाऊसाहेब गायकवाड, महेश काळे, मनोज राजगुरू, बाळू जायभाय, सुशील आव्हाड, भरत उगले, मकरंद राऊत, अशोक भोरे, अंकुश कात्रजकर, उमेश रोडे, दिगंबर जगताप, हनुमंत शिंदे, विनोद उगले, दत्ता जाधव, रमेश ढगे, प्रशांत पवार, गौतम कोल्हे यांचा समावेश आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे तालुक्यात पक्ष अधिक मजबूत होईल, गावोगावी पक्षाची घडी घट्ट बसेल आणि आगामी निवडणुकांमध्ये भाजप विजयश्री मिळवेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनीही पक्षनिष्ठा दृढ ठेवून जनतेशी संवाद वाढविण्याची ग्वाही दिली.. "पक्षाची खरी ताकद ही कार्यकर्त्यांमध्ये असते. प्रत्येक बूथ बळकट केल्याशिवाय विजय शक्य नाही," असे भाजपा तालुकाध्यक्ष बापूराव ढवळे यांनी यावेळी सांगितले. नव्या कार्यकारिणीमुळे जामखेड तालुक्यात नव्या उत्साहाची आणि उमेदची लाट निर्माण झाली असून, आगामी काळात ही कार्यकारिणी विकास व जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करणार असल्याचे संकेत दिले गेले. **रयत समाचार**

# स्वतंत्र लढण्याच्या घोषणेमुळे सर्व पक्षात असंतोष आणि नाराजी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

सत्तेत नसेपर्यंत पक्षाचे नेते कार्यकर्त्यांना मोठमोठी भाषणे आणि आश्वासने देतात. आणि सत्ता मिळाली का त्यांच्याकडे ढुंकूनही न पाहण्याच्या गलिच्छ वृत्तीमुळे कार्यकर्त्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास केवळ पक्षांच्या श्रेष्ठींमुळेच हिरावला जात असल्याची खंत कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केली जात आहे. वेगवेगळ्या पक्षातील श्रेष्ठींच्या या घोषणेमुळे कार्यकर्त्यांमध्ये मात्र प्रचंड संतापाची लाट आणि नाराजी निर्माण झाली आहे.

नगरपालिका निवडणुकांमध्ये जेथे पक्षाची ताकद आहे तेथे स्वतंत्र लढण्याचा त्या त्या पक्षाच्या श्रेष्ठींनी हाक दिली आहे. ती कार्यकर्त्यांच्या मुळावर असून यामुळे कार्यकर्ते खचले जाण्याची चिन्हे आहेत. पक्ष वाढीसाठी ज्या ज्या कार्यकर्त्यांनी आपली संपूर्ण हयात पक्षात घालवली अशा काही कार्यकर्त्यांना हकालपट्टीला सामोरे जावे लागले. स्वतः ला मतदान करून घ्यायचे असल्यास पक्षश्रेष्ठी मात्र नको त्यांच्याशी युती करून कार्यकर्त्यांना गप्प बसवतात. निवडून आल्यानंतर मात्र याच कार्यकर्त्यांना पक्षश्रेष्ठी कडून नको त्या कारवाईला सामोरे जावे लागते. पक्षातील श्रेष्ठी आणि नेता खालच्या कार्यकर्त्याला जुमानत नसल्यामुळे वेगवेगळ्या पक्षात आता मरगळीची लाट आली आहे. या नाहीतर त्या,आणि त्या नाही तर या अशा वेगवेगळ्या निवडणुकीत आपल्याला पक्षश्रेष्ठी आणि नेता संधी देईल या आशेवर कार्यकर्ता मात्र आपल्या जीवाची बाजी लावून नको त्यांच्याशी वैर पत्करून निवडणूक लढविण्याची तयारी करत असतो. मात्र ऐन वेळेला पक्षश्रेष्ठी आणि नेते मागचा पुढचा कसलाही विचार न करता कार्यकर्त्यांच्या स्वप्नांचा चुराडा करीत आहेत. ज्यामुळे प्रत्येक पक्षात आता कुणासाठी आणि का काम करावयाचे अशी भावना निवडणूक लढवणाऱ्या इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये तयार झाली आहे. स्वतः निवडणूक लढवितांना नेता असंगांशी संग करून सत्ता मिळवित असतो. मात्र कार्यकर्त्यांना संधी देण्याची वेळ आलीच तर त्याला थेट पक्षातून काढण्याबरोबरच त्याचे राजकारणात खच्चीकरण कसे करता येईल यासाठी देखील आराखडे आखले जात आहेत यामुळे कार्यकर्त्यांची राजकारणात इच्छा मरणासन्न अवस्थेत आहे. नेत्यांसाठी कार्यकर्ता जीवाची घरादाराची आणि संसाराची देखील परवा करीत नाही. असे असताना याच कार्यकर्त्यांना मात्र हातात तोंडाशी घास आला तर तो नेत्यांच्या पायाजवळ पाहण्याच्या घाणेरड्या वृत्तीमुळे हिरावला जात असल्याची खंत कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. भारतीय जनता पक्ष हा निष्ठेवर चालणारा पक्ष असल्याचे यापूर्वी बोलले जायचे. मात्र पक्षाच्या अलीकडच्या काही निर्णयामुळे पक्षावर टीका होऊ लागली आहे. भाजपाच्या निष्ठेवर अलीकडे पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी असंतोष आणि प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. भाजपा बरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेतही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. याही पक्षात निवडणूक लढविण्यास अनेक जण सज्ज असले तरी उमेदवारी मिळेल की नाही याची मात्र त्यांना आजही खात्री नाही. यामुळे त्यांनी आजपर्यंत केलेल्या तयारीवर पाणी फेरले जाण्याची शंका निर्माण झाली आहे. पक्षश्रेष्ठी आणि नेत्यांच्या स्थानिक पातळी बाबत निर्णय घेण्याच्या चुकीच्या धोरणामुळे निवडणूक लढविणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये निरुत्साह आहे. यामुळे मात्र सच्चा आणि प्रामाणिक कार्यकर्त्याला थेट घरी बसण्याची वेळ आली आहे. निवडून येण्याची क्षमता असतानाही ऐनवेळी उमेदवारी मिळत नसल्यामुळे कार्यकर्ते पूर्णतः हिरमुसले आहेत. एकमेकांच्या जिरवा जिरवीत आणि पक्षातील श्रेष्ठी आणि नेत्यांमुळे कार्यकर्त्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याची खंत आणि खेदही शेकडो कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केला जात आहे. **रयत समाचार**



# सुजाता स्कूलमध्ये अभिनेत्री सावंत यांच्या हस्ते मैदानाचे उद्घाटन

**नेवासा । विजय खंडागळे**

आजच्या तंत्रज्ञानाच्या स्पर्धेच्या युगात शालेय शिक्षणाबरोबरच मैदानी खेळांचे महत्त्व लक्षात घेता, सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज तसेच सुजाता मॉडर्न कॉलेज ऑफ बीसीएच्या भव्य प्रांगणात सिने अभिनेत्री पूजा सावंत यांच्या हस्ते बास्केटबॉल मैदानाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक आदरणीय किरण सोनवणे उपस्थित होते. अभिनेत्री पूजा सावंत यांचे स्वागत शाळेच्या संचलन पथकाने तसेच लहानग्या विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन केले. सहशिक्षिका उमा बऱ्हाटे यांनी पूजा सावंत यांचा सन्मान केला. वात्सल्य प्रतिष्ठान अंतर्गत उभारण्यात आलेल्या शैक्षणिक संकुलात सुजाता इंटरनॅशनल स्कूल, सुजाता ज्युनियर कॉलेज, सुजाता सीबीएसई स्कूल आणि मॉडर्न कॉलेज ऑफ बीसीए अशा विविध शाखा कार्यरत आहेत. संस्थापक किरण सोनवणे यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासालाही समान प्राधान्य देत सुजाता कॅम्पसमध्ये भव्य क्रीडांगणाची निर्मिती केली. यात खो-खो, कबड्डी, भालाफेक, उंच उडी, लांब उडी, क्रिकेट, कुस्ती आणि बास्केटबॉल अशा विविध खेळांसाठी प्रशस्त सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. कार्यक्रमात बोलताना अभिनेत्री पूजा सावंत म्हणाल्या, "शाळेचा निसर्गरम्य व प्रशस्त परिसर पाहून मी भारावून गेले. ग्रामीण भागातूनच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतात, आणि सुजाताचा हा उपक्रम त्याचे उत्तम उदाहरण आहे." त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी पूजासोबत सेल्फी घेतली, तर काहींनी त्यांच्या "अधीर मन झाले" या लोकप्रिय गीताच्या सुरांवर निरोप दिला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुजाता फॅमिलीतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे निवेदन संदीप चौधरी यांनी केले, तर आभारप्रदर्शन स्वाती गडाख यांनी केले. **रयत समाचार**

# प्रा. देवराम शिंदे यांना 'नवराष्ट्र जनसेवक पुरस्कार'



**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्री संत सावता माळी पतसंस्थेचे संस्थापक प्रा. देवराम शिंदे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना राज्यस्तरीय 'नवराष्ट्र जनसेवक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आदर्श गाव हिवरे बाजार येथे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व हिवरे बाजार ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष पद्मश्री पोपट पवार यांच्या हस्ते प्रदान झाला. या सन्मानानिमित्त पिंपळगाव माळवी येथील ग्रामस्थांनी १८ ऑक्टोबर रोजी सावता माळी मंदिरात प्रा. शिंदे यांचा भव्य सत्कार आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच दत्तात्रय भोंदे होते. या प्रसंगी प्राचार्य बापूसाहेब गायकवाड, प्रशांत खंडागळे, जानकीराम बनकर, हभप कृष्णा महाराज रायकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "हा सत्कार केवळ वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण गावाचा अभिमान आहे. प्रा. शिंदे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे." सत्काराला उत्तर देताना प्रा. देवराम शिंदे म्हणाले, "हा केवळ माझा नव्हे तर सर्व ग्रामस्थांचा सन्मान आहे. आपले कर्म प्रामाणिकपणे करणे हाच खरा परमार्थ आहे. प्रत्येकाने आपल्या परीने समाजकार्यात सहभाग घेतल्यास प्रत्येक गाव आदर्श होऊ शकते." या प्रसंगी प्राचार्य शिवाजी गायकवाड, प्रा. सोमनाथ पुंड, कॅप्टन हरिराम शिंदे, माजी सरपंच संतोष झिने, पतसंस्थेचे व्यवस्थापक वैभव सदावर्ते, प्रा. प्रवीण गायकवाड यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिदास पुंड यांनी केले, तर आभार संतोष बनकर यांनी मानले.

# सुशिलकुमार शिंदेंचा स्वखर्चाने विकासकामांचा धडाका

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरातील मांडवगण रोड ते वडाळी रोड हा प्रभाग क्रमांक दोन असून, येथील गणपती मळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेहेत्रे वस्ती या शाळेसाठी सुशिल कुमार शिंदे यांनी स्वखर्चाने विकासकामांना सुरुवात केली आहे. यामध्ये शाळेसाठी कॉम्प्युटर प्रिंटर, ग्राउंडमध्ये मुरूम आणि लाल माती टाकून साफसफाई, शाळेला रंगरंगोटी देणे, तसेच सीसीटीव्ही बसवण्याचे काम यांचा समावेश आहे. शिंदेंच्या या पुढाकारामुळे अनेक दानशूरांनी पुढे येऊन शाळेसाठी मदत केली आहे. प्रभागांमध्ये रोही वस्ती, आळेकर मळा, गणिशे मळा, गणपती मळा, शिक्षक कॉलनी, बनकर नगर, लक्ष्मी नगर आणि पोलीस स्टेशनजवळील भागांवरील रस्त्यावरील साफसफाईचे कामही शिंदेंच्या माध्यमातून करण्यात आले आहे. नगरपालिकेच्या स्थापनेनंतर अनेक वर्षे उलटून गेल्या तरी पूर्वीच्या नगरसेवकांनी किंवा नगराध्यक्षांनी या प्रभागात



विकासकामे केलेली नव्हती. त्यामुळे सुशिल शिंदे यांनी स्वतःच्या स्वखर्चाने हे विकासकाम करून दाखवले आहे. यामुळे स्थानिक नागरिक त्यांच्या पुढाकाराबद्दल आभार मानत आहेत आणि पुढील कामांसाठी शुभेच्छा देत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक दोनमध्ये सुशिल शिंदे संभाव्य उमेदवार असतील अशी चर्चा लोकांमध्ये सुरू आहे. प्रभागातील तरुण वर्ग शिंदेंच्या पाठीमागे खंबीरपणे उभा असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. तरुणांचे म्हणणे आहे की, "जो तरुण मतदारांच्या प्रश्नांची जाण ठेवीत आहे, त्याच्यामागे आम्ही खंबीरपणे उभे राहणार आहोत," आणि ते समोरील उमेदवारांना प्रचंड विरोध करत आहेत, असे दिसत आहे. **रयत समाचार**

# कुटुंबाला समाजसेवेचा वारसा देऊन शांताबाई शेळके यांचे वैकुंठगमन

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यात हाडाचे समाजसेवक म्हणून परिचित असलेल्या माजी नगराध्यक्ष नंदकुमार शेळके यांच्या मातोश्री व नगर परिषदेच्या राजकीय सारीपाटावर रांगू लागलेले युवा नेते प्रशांत शेळके यांच्या पितामही शांताबाई शेळके यांचे नुकतेच वैकुंठगमन झाले. वैकुंठगमनसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या. शेळके कुटुंब हे मूळचे पारनेर तालुक्यातील वाडेगव्हाण गावचे रहिवासी...परंतु तीन पिढ्यांपूर्वी हे



कुटुंब पाथर्डी शहरात स्थायिक झाले. बाहेरुन येऊन पाथर्डी शहराच्या राजकारणात मैलाचा दगड ठरलेल्या या परिवाराला आध्यात्मिक व सामाजिक परंपरा आहे. विजय, राम व बाबुराव उर्फ नंदकुमार हे तीन सुपुत्र व दोन सुकन्या ही शांताबाई व त्यांचे पती गुलाबराव शेळके यांच्या पोटी उपजलेली अपत्ये. गुलाबरावांचे अकालीच वैकुंठगमन झाल्यावर शांताबाईंनी मोठ्या धीराने उघड्यावर पडलेला त्यांचा परिवार सावरला. त्यांच्या अपत्यांना उत्तम संस्कार दिले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांची दोन मुले अनुक्रमे विजय व राम यांचेही अकालीच निधन झाले. हयातीत कोसळलेल्या या एकामागून एक संकटांनी खचून न जाता शांताबाई शेळके यांनी धाकटा मुलगा नंदकुमार व संजय, प्रदीप आणि प्रशांत या नातवंडांचा सांभाळ केला. पांडुरंगाच्या निस्सीम भक्त असलेल्या शांताबाई या गोसेविकाही होत्या. दरवाजात आलेल्या गरजूंना त्यांनी कधीही विन्मुख परतू दिले नाही. आजही त्यांचा परिवार तोच वसा आणि वारसा पुढे चालवत आहे. दोन वेळा ग्रामपंचायत सदस्य, पाच वेळा नगरसेवक, एकदा नगराध्यक्ष व एकदा उपनगराध्यक्ष अशी प्रदीर्घ राजकीय कारकीर्द लाभलेले त्यांचे सुपुत्र बाबुराव उर्फ नंदकुमार शेळके यांच्या मातृशोकात सहभागी झालेला प्रचंड जनसमुदाय हीच शेळके परिवाराची सामाजिक श्रीमंती आणि आध्यात्मिक शिदोरी होय.

# भगवान धन्वंतरी जयंतीनिमित्त ज्येष्ठ डॉक्टरांचा गौरव

**पाथर्डी । नितीन गटाणी**

भगवान धन्वंतरी जयंतीच्या दिवशी, धनत्रयोदशीला तालुक्यातील सेवाभावी जेष्ठ वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्याची परंपरा डॉक्टरांमध्ये सुसंवाद वाढविणारी आणि रुग्णसेवेची प्रेरणा देणारी ठरते. निमा संघटना ही डॉक्टरांच्या भावनिकतेचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे, असे मत ज्येष्ठ वैद्यक व्यावसायिक डॉ. बाळकृष्ण मरकड यांनी व्यक्त केले. लक्ष्मी नृसिंह प्रतिष्ठान, निमा संघटना पाथर्डी शाखा यांच्या वतीने आयोजित गौरव समारंभात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी बालरोग तज्ज्ञ डॉ. विलास बाहेती उपस्थित होते. आरोग्यशास्त्राचे जनक म्हणून भगवान धन्वंतरी यांकडे बघितले जाते; सृष्टीच्या कल्याणासाठी आणि मानवजातीच्या विकासासाठी त्यांचा अवतार मानला जातो. समारंभात चैतन्य उद्योग समूहाचे अनंत ढोले पाटील, वेदशास्त्र संपन्न रवींद्र



कुलकर्णी यासह शहरातील विविध डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाळकृष्ण मरकड, डॉ. सुनिता मरकड, डॉ. आश्रुबा जायभाय, गुणवंत शिक्षक अविनाश दराडे यांचा गौरव संयोजकांच्या वतीने करण्यात आला. यावेळी वेद मंत्रोच्चारात भगवान धन्वंतरीचे सामूहिक पूजनही संपन्न झाले. बोलताना डॉ. बाळकृष्ण मरकड म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून निमा संघटना व लक्ष्मी नृसिंह प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील जेष्ठ वैद्यक व्यावसायिकांचा सन्मान केला जातो. त्यामुळे नव्याने व्यवसाय करणारे व जुन्या पिढीतील डॉक्टर यांचा परस्पर परिचय होतो आणि विचारांची आदानप्रदानाची संधी मिळते.

दिवसेंदिवस चिकित्सा व उपचार पद्धती बदलत आहेत; तरीही रुग्ण व डॉक्टर यांचा भावनिक संबंध अजूनही टिकलेला आहे. डॉक्टरांना देव समजणारा आपला समाज खूप प्रेम करतो, आणि त्या प्रेमाची उतराई डॉक्टरांकडून नेहमी होत राहते." डॉ. मरकड यांनी पुढे सांगितले की, "समाजात सकारात्मक भावनेने एकत्र येऊन होणारा संवाद गुणवत्ता वाढवतो.

कार्याची दखल घेऊन समारंभाच्या माध्यमातून ओळख करून दिल्याने अशा कार्यक्रमांचे आयोजन सर्व सामाजिक संघटनांमध्ये त्या त्या क्षेत्रापुरते व्हावे. आपणच आपले परीक्षक, आपणच आपले शिक्षक होऊ, असे सूत्र डोळ्यापुढे ठेवून वाटचाल केल्यास समाजात आदर्श जीवनशैली निर्माण होईल. आहारशास्त्र व विहारशास्त्र याची डॉक्टरांकडून ओळख झाल्यास आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याची जाणीव तीव्रतेने होऊ शकेल." कार्यक्रमाचे प्रास्ताविक निमा संघटनेचे तालुकाध्यक्ष डॉ. श्रीधर देशमुख यांनी केले, धन्वंतरी फर्टिलिटी सेंटरच्या संचालिका डॉ. ज्योती देशमुख यांनी स्वागत, प्रणव देशमुख यांनी सूत्रसंचालन तर ज्ञानेश्वर दराडे यांनी आभार मानले. **रयत समाचार**

# मानवतेचा दीप लावू

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण. दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील १३ कोटी जनता देवाजवळ करत आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# वाद्यरंग महोत्सवात दुर्मिळ पारंपारिक लोककलांचे दर्शन

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने प्रभादेवी मुंबई येथील कलांगणच्या व्यासपीठावर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव, श्रीगोंदा, राहुरी, नेवासा तालुक्यातील दुर्मिळ व पारंपारिक लोककलावंतांनी आपली विविध रंगी कला सादर करून सप्तरंगाची उधळण केली. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमास वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सांस्कृतिक खात्याचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, सहसंचालक श्रीराम पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककला अभ्यासक व मुक्त पत्रकार भगवान राऊत यांच्या पुढाकारातून रामनगर शेवगाव येथील स्मशान जोगी लक्ष्मण शेंडरे, हनुमंता कडमींचे, डक्कलवार धर्मा कांबळे, रामा यशवंत वीर, नेवासा तालुक्यातील नजीक चिंचोली येथील गोंधळी दिगंबर गोंधळी, राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील पिंगळा जोशी दिलीप वायफळकर, बालाजी वायफळकर, श्रीगोंदा तालुक्यातील ढोकराई येथील शामराव शिंदे, मारुती शिंदे, राजू शिंदे व शिवाजी थिटे आदी कलावंत घाटोळे, शंख, किंगरी, संबळ, दिमडी, गुडगुडी, सारंगी आदी दुर्मिळ व पारंपारिक वाद्य घेऊन सहभागी झाले होते. प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरा शेजारी कलांगण परिसरात विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते फीत कापून या प्रदर्शन व वाद्यरंग महोत्सवाचे शानदार उद्घाटन झाले. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांना विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्य तसेच महाराष्ट्रातील विविध पारंपारिक लोककलांबद्दल माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते विधिनाट्य व इतर पुस्तकाचे प्रकाशन तसेच टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. वाद्यरंग हा अतिशय उत्तम कार्यक्रम असून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये विविध पारंपारिक लोककला व लोकवाद्यांचे उच्च स्थान आहे. वाद्यरंग महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व लोक कलावंतांचे त्यांनी कौतुक केले. या कार्यक्रमास अहिल्यानगर आकाशवाणी केंद्राचे माजी कार्यक्रमाधिकारी बाबासाहेब खराडे, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे राज्यसचिव ॲड. कॉम्रेड सुभाष लांडे पाटील, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा कवयित्री रीता जाधव यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कलावंतांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या कलेचे कौतुक केले. या कार्यक्रमात पालघर व ठाणे जिल्ह्यातील विविध आदिवासी पाड्याहून तारपा, तुर, गांगळी, डाक, सुरथाळ, सनई, संबळ अशी वाद्य घेऊन विवाह सुनाड, अर्जुन नडगे, जाना देऊ, वाजे लक्ष्मण, गोविंद गंगा, गोविंद सिताराम, बर्फ तुकाराम खरपडे, राजन वैद्य असे कलावंत सहभागी झाले होते. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील अनेक आदिवासी बंधू भगिनी डेरा, मादळ, नगरा सारखी वाद्य घेऊन सहभागी झाले होते.



# पिसाळलेल्या कुत्र्याचा चौघांना चावा; दोघांची प्रकृती गंभीर


**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरात रविवारी दिवाळी सणाच्या खरेदीच्या गर्दीत पिसाळलेल्या कुत्र्याने चार नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे. घटना शहरातील एका हॉटेलसमोर घडली. दुसऱ्या व्यक्तीला दुकानात चढत असताना कुत्र्याने चावा घेतला. तसेच रस्त्यावरून जात असलेल्या आदिवासी समाजातील एका व्यक्तीला आणि त्यांच्या मुलालाही चावा घेतल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी झालेल्या नागरिकांमध्ये पेडगाव येथील नवनाथ सुदाम मोहिते, नवनाथ नगर येथील युवराज राजू बिबे आणि आदिवासी समाजातील दोन नागरिकांचा समावेश आहे. युवराज राजू बिबे यांना राजू पाटील मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले गेले, नंतर सर्वांना श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, नगर येथे हलवण्यात आले.

**श्रीगोंदा शहरात मोकाट जनावरे व कुत्र्यांचा मोठा त्रास असून नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या तरी नगरपरिषदेने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. आता प्रशासन जाग येईल का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**



नागरिकांचा आरोप आहे की, श्रीगोंदा नगरपरिषदेने मोकाट कुत्रे व अन्य जनावरांवर नियंत्रणासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. योग्य वेळी कारवाई झाली असती तर ही घटना टाळता आली असती. देशभरात, विशेषतः महाराष्ट्रात, मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचे प्रमाण वाढल्याने लहान मुले आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत आहे. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी उद्या मुख्याधिकारी भगत मॅडम यांची भेट घेऊन नगरपरिषदेने आतापर्यंत काय कारवाई केली आहे याबाबत जाब विचारण्याचे सांगितले. तसेच संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदनही दिले जाणार आहे. रयत समाचार



# आपण जे दान करतो ते हृदयातील प्रेम, सहानुभूतीचे प्रतीक– ॲड. काकडे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

'आपण जे दान करतो, ते केवळ वस्तू नसून ते आपल्या हृदयातील प्रेम, करुणा आणि सहानुभूतीचे प्रतीक असते. आपल्या या प्रयत्नांमुळे जर एखाद्या आईच्या डोळ्यात आनंदाश्रू आले, एखाद्या मुलाच्या चेहऱ्यावर दिवाळीचा प्रकाश फुलला, तर समजा आपण दादाजींच्या शिकवणीला न्याय दिला,'' असे प्रतिपादन ॲड. अभिजीत काकडे यांनी केले. शेवगाव येथील गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने दिवाळी निमित्त गरीब व गरजू कुटुंबांना मोफत किराणा साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ता. १८ ऑक्टोबर रोजी श्रीदत्त देवस्थानच्या दादाजी प्रसादालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय.डी.बी.आय. बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक आनंद साकुळकर होते. यावेळी माजी प्राचार्य किसन माने, शेवगाव पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कैलास बुधवंत, गुरुदत्त संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, दिलीप फलके, हनुमानप्रसाद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. माजी प्राचार्य किसन माने म्हणाले, ''दादाजींनी दिलेली 'सेवा हीच साधना, माणुसकी हीच खरी भक्ती' ही शिकवण आज आपल्या कृतीतून प्रकट होते. गरजूंना सणासुदीचा आनंद देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे हीच खरी ईश्वरसेवा आहे.'' पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलास बुधवंत म्हणाले, ''धार्मिक व आध्यात्मिक कार्यास सेवा धर्माची जोड देत गुरुदत्त सामाजिक संस्थेने उभारलेले हे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. हीच खरी दादाजींना श्रद्धांजली ठरेल.'' यावर्षी संस्थेच्या ज्येष्ठ साधक समूहाच्या वतीने १८१ गरीब व गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी सुरेश घुले, काकासाहेब लांडे, सुभाष घुगे, लक्ष्मण ज्योतीक, लक्ष्मण काळे, संजय कुलकर्णी, रामनाथ शेकडे, महेश देशमुख, बंडोपंत भोर, निलेश रोकडे, योगेश रोकडे आणि प्रमोद कांबळे यांनी नियोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी केले, तर आभार निलेश रोकडे यांनी मानले. रयत समाचार

# सेनापती बापट साहित्य संमेलन विविध स्पर्धांचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागांतर्गत साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मार्गदर्शनाखाली ता. ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट साहित्य संमेलन आयोजित केले आहे. संमेलनाच्या निमित्ताने नगर जिल्ह्यातील विद्यार्थी, पालक व शिक्षकांसह साहित्यप्रेमींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. आत्मनिर्धार फाउंडेशन (निंबळक) तर्फे आयोजित या स्पर्धांमध्ये निबंध, चित्रकला, कविता लेखन व वेशभूषा स्पर्धांचा समावेश आहे. प्रवेशिका ३ नोव्हेंबरपर्यंत स्वहस्ते, पोस्ट, कुरियर किंवा ईमेल (aatmnirdharfoundation2014@gmail.com) द्वारे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८२३९३४२४६ या क्रमांकावर संपर्क साधावा. निबंध स्पर्धेच्या विषयांमध्ये 'सेनापती बापट यांचे विचार व कार्य', 'नगर जिल्ह्याचे साहित्य-संस्कृतीमधील योगदान' आणि 'नगर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक' यांचा समावेश आहे. चित्रकला स्पर्धेत 'सेनापती बापट किंवा इतर स्वातंत्र्यसैनिकांची भावमुद्रा' या विषयावर काम करावे लागेल. वयानुसार चार गट (५१०, १११५, १६२० वर्षे व खुला गट) ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातून तालुकानिहाय व जिल्हास्तरीय विजेत्यांची निवड करून साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाईल. कविता लेखन स्पर्धा 'सेनापती बापट यांचे विचार व कार्य' या विषयावर आयोजित करण्यात आली आहे. वेशभूषा स्पर्धा ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० ते ९.३० दरम्यान ग्रंथफेरी व ग्रंथदिंडी कार्यक्रमात होणार असून यामध्ये 'भारतातील महत्वाचे लेखक, महापुरुष व पारंपरिक वेशभूषा' या विषयावर सादरीकरण करावे लागेल. आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी सांगितले की, सेनापती बापट यांच्या स्मृतीसंदर्भातील हे साहित्य संमेलन नगर जिल्ह्यातील साहित्यिक व सर्जनशील मंडळींना जोडण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. सर्व शाळा, शैक्षणिक संस्था व साहित्य रसिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सदर माहिती अधिकृत फेसबुक पेज 'अहिल्यानगर साहित्य संमेलन' (www.facebook.com/ahilyanagar.sahitya) वर पाहता येऊ शकते.




# संभाजी ब्रिगेड पक्ष सर्व निवडणुका ताकदीने लढवणार– इंजि. शाम जरे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



दिवाळीनंतर होणाऱ्या नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी संभाजी ब्रिगेड पक्षाकडून जोरदार तयारी सुरू आहे, असे पक्षाचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शाम जरे यांनी सांगितले. २०१९ साली नवीन पक्ष म्हणून मान्यता मिळाल्यानंतर संभाजी ब्रिगेडने श्रीगोंदा विधानसभा तसेच नगरपरिषद निवडणुका लढवून आपले अस्तित्व ठळकपणे दाखवले. संघटनात्मकदृष्ट्या पक्षाने विविध आघाड्या स्थापन करून जेष्ठ नागरिक, महिला, युवक, कामगार, उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांचा सहभाग सुनिश्चित केला आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाने खासदार निलेश लंके व अपक्ष माजी आमदार राहुल जगताप यांना पाठिंबा दिला व जनतेत आपली ताकद ठळकपणे दाखवली. आगामी निवडणुकांमध्ये मांडवगण, आढळगाव, कष्टी या जिल्हा परिषद गटांत तसेच श्रीगोंदा नगरपरिषदेत पक्षाने उमेदवार उभे करण्याची तयारी पूर्ण केली आहे. भानगाव पंचायत समितीसाठी इंजि. शामभाऊ जरे प्रबळ दावेदार असून, इतर गटांत उपाध्यक्ष आणि सचिवपदीही उमेदवारी निश्चित झाली आहे. ''लोकसभा व विधानसभा निवडणुकांमधील अनुभव, संघटनेचे बळ आणि जनसमर्थन यांच्या जोरावर आम्ही स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये मोठे यश मिळवू,'' असे तालुकाध्यक्ष जरे यांनी ठाम मत व्यक्त केले. रयत समाचार

# भूतकाळ विसरून वर्तमानात आनंदाने जगा– राजगुरु

## गुरुदत्त सामाजिक संस्थेचा वृद्धाश्रम सेवा उपक्रम

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

'काळ असा असतो की आपण काहीच सांगू शकत नाही. भूतकाळातील सुखद क्षणांची आठवण मनाला जड करते. पण सत्याचा स्वीकार करून वर्तमानात आनंदाने जगणं हेच खरे आयुष्य आहे,'' असे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना सांगितले. शेवगाव येथील योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन वृद्धाश्रमात रविवार, ता. १९ रोजी गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात आजी-आजोबांना मोफत साडी-चोळी व कपड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून निरज राजगुरु उपस्थित होते. कार्यक्रमात पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, सुभाष घुगे, काकासाहेब लांडे, निलेश रोकडे, हनुमानप्रसाद जोशी, लक्ष्मण काळे आदी मान्यवर उपस्थित होते. निरज राजगुरु म्हणाले, ''या जगात देवांनाही दुःख भोगावे लागले आहे. आपण माणसं आहोत, म्हणून सुख-दुःखाचा विचार न करता प्रत्येक क्षण आनंदाने व्यतीत करा. या वृद्धाश्रमातील पदाधिकारी आणि रहिवासीच आता तुमचे खरे नातेवाईक आहेत, असा समज ठेवा. आम्हीही तुमच्या सोबत आहोत.'' यानंतर त्यांनी आजी-आजोबांशी संवाद साधून त्यांच्या पूर्वायुष्याची माहिती घेतली. त्यांना आपुलकीची जाणीव करून दिली तसेच आरोग्यविषयक सल्ला दिला. तसेच येणाऱ्या अडचणींसाठी आधारकार्ड, आरोग्य व इतर विभागीय शिबिरांचे आयोजन करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमादरम्यान निरज राजगुरु व पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांचा वृद्धाश्रमाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पोकॉं. बप्पासाहेब धाकतोडे, शाम गुंजाळ, भगवान सानप, सुभाष खिळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अर्जुनराव फडके यांनी केले, सूत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी तर आभार प्रदर्शन निलेश रोकडे यांनी केले. रयत समाचार



**सेवेच्या माध्यमातून आनंदाचा प्रसार गुरुदत्त सामाजिक संस्थेचा उपक्रम वृद्धाश्रमवासीयांसाठी आनंदाचा क्षण ठरला.**

# नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस घ्यावे– शिक्षकभारती

**पुणे । रयत समाचार**

शिक्षक भारती संघटनेने नविननियुक्त शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिवाळीच्या सुट्टीत न घेता एप्रिल महिन्याच्या अखेरीस आयोजित करण्याची मागणी केली आहे. याबाबत , पुणे येथील संचालक राहुल रेखावार यांना निवेदन सादर करण्यात आले. शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे म्हणाले की, दिवाळी सुट्टी शिक्षकांसाठी कौटुंबिक वेळ आणि विश्रांतीसाठी असते. त्यामुळे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस घेणे योग्य राहील. त्यांनी सांगितले की, या काळात प्रशिक्षण घेतल्यास उपस्थिती जास्त राहील आणि दर्जाही वाढेल. निवेदनप्रसंगी शिक्षक भारतीच्या अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती, ज्यात अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर आणि इतर पदाधिकारी सहभागी होते.